# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.05.2026** **वारः सोमवार**

---

1. आयात केलेल्या इंधनावरील अवलंबित्व कमी करून इंधनाची काटकसर करण्याचं पंतप्रधानांचं आवाहन, हैदराबाद मध्ये 9 हजार 400 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचं उद्घाटन
2. गुजरातमधील 'सोमनाथ अमृत पर्व' उपक्रमात पंतप्रधान आज सहभागी होणार
3. देशातील उष्णतेच्या लाटा आणि संभाव्य पूरपरिस्थिती संदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घेतला सज्जतेचा आढावा आणि
4. सतरा आणि पंधरा वर्षांखालील आशियाई मुष्टीयुद्ध स्पर्धेत, भारताचे सहा मुष्टीयोद्धे विविध वजनी गटात अंतिम फेरीत दाखल

**मोदी-तेलंगण दौरा**

ऊर्जा सुरक्षा ही आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाची गरज असून केंद्र सरकार या क्षेत्रात अभूतपूर्व गुंतवणूक करत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल हैदराबादमध्ये एका जाहीर सभेला संबोधित करताना केलं. आयात केलेल्या इंधनावरील अवलंबित्व कमी करून, सार्वजनिक वाहतूक आणि कारपूलिंगला प्रोत्साहन द्यावं आणि त्याद्वारे आर्थिक आत्मनिर्भरता आणखी भक्कम करावी असं आवाहन त्यांनी जनतेला केलं. विविध प्रकारच्या इंधनाचा वापर काटकसरीनं करण्याचं तसंच डेस्टिनेशन वेडिंग आणि सोन्याच्या खरेदीसह परदेशी खर्च कमी करण्याचं आवाहनही मोदी यांनी केलं आणि आणि 'व्होकल फॉर लोकल' उपक्रमाचा पुनरुच्चार केला.

या दौऱ्यादरम्यान उद्घाटन झालेल्या सुमारे 9 हजार 400 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांमध्ये जहीराबाद औद्योगिक क्षेत्र आणि वारंगलमधील पीएम मित्रा टेक्सटाईल पार्कचा समावेश आहे. हैदराबाद इथलं कर्करोगाच्या उपचारांवर भर देणारं 'सिंधू रुग्णालय' पंतप्रधानांनी राष्ट्राला समर्पित केलं.

**पंतप्रधान-बेंगलुरू**

शेतकरी तसंच ग्रामीण समुदायांना नैसर्गिक शेती करण्यास प्रवृत्त करण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशनसारख्या आध्यात्मिक केंद्रांची मदत होऊ शकेल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल बंगळुरू इथं केलं. बेंगळुरु इथं आर्ट ऑफ लिव्हिंगच्या 45व्या वर्धापन दिन समारंभात ते बोलत होते. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते केंद्रात नव्यानं उभारण्यात आलेल्या ध्यान मंदिराचंही उद्घाटन करण्यात आलं.

**नरेंद्र मोदी**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या गुजरातमधील सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाला यंदा 75 वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्तानं आयोजित 'सोमनाथ अमृत पर्व' उपक्रमाला प्रभास पाटण इथं, पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उपस्थित राहणार आहेत. सोमनाथ मंदिरात ते पूजा करणार असून ध्वजारोहण समारंभात सहभागी होणार आहेत. त्यानंतर एका जाहीर सभेलाही पंतप्रधान संबोधित करतील.

संध्याकाळी बडोदा इथल्या 'सरदारधाम वसतिगृहा'चं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. या वसतिगृहात 1 हजार मुलं आणि 1 हजार मुलींसाठी वसतिगृह, भोजन सुविधा, ग्रंथालय यांसारख्या सोयीसुविधांचा समावेश आहे. सरदारधाम संकुलातील विविध विभागांनाही मोदी भेट देणार आहेत.

**अमित शाह-आढावा**

देशातील उष्णतेच्या लाटा आणि संभाव्य पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल नवी दिल्लीत, उच्चस्तरीय बैठक घेऊन यासंबंधीच्या सज्जतेचा आढावा घेतला. संकटकालीन इशारा देणाऱ्या यंत्रणा, आवश्यक संसाधनांची उपलब्धता, तसेच विविध शासकीय संस्थांमधील समन्वय यांचा या बैठकीत सखोल आढावा घेण्यात आला. दीर्घकालीन पूर निवारण उपाययोजनांच्या प्रगतीवरही चर्चा करण्यात आली.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण म्हणजे NDMA च्या मदतीनं जम्मू आणि काश्मीर, लडाख, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीममधील 30 उच्च-जोखमीच्या तलावांसाठी पूर्वसूचना प्रणाली विकसित करण्याच्या योजनेत किमान 60 तलावांचा समावेश केला पाहिजे असं शाह यांनी सांगितलं.

नद्यांवर बंधारे बांधून पाण्याचं संवर्धन करणं आणि तसंच उष्णतेच्या लाटांचा प्रभाव कमी करणं हे उद्दिष्ट ठेवलं पाहिजे असं ते म्हणाले. उष्णतेच्या लाटांमुळे कृषी क्षेत्राचं कमीत कमी नुकसान होईल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, यावर त्यांनी भर दिला.

या बैठकीत आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांची कार्यक्षमता अधिक बळकट करण्यावर आणि भविष्यातील नैसर्गिक आपत्तींसाठी देशाला अधिक सुसज्ज ठेवण्याच्या गरजेवर भर देण्यात आला.

**तामिळनाडू**

तमिळनाडूमध्ये टीव्हीके पक्षाचे सी. जोसेफ विजय यांनी काल तमिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. 234 सदस्यांच्या सभागृहात विजय यांनी 120 आमदारांचा पाठिंबा मिळवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विजय यांचं अभिनंदन केलं असून त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. टीव्हीकेनं येत्या बुधवारी विधानसभेत बहुमत सिद्ध करावं असं राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी सांगितलं आहे.

**आसाम**

दरम्यान आसाम विधानसभेत भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी हिमंता बिस्व सरमा यांची निवड करण्यात आली. गुवाहाटीत झालेल्या पक्षाच्या बैठकीत ही निवड करण्यात आली. उद्या मंगळवारी आसामच्या नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी होणार आहे.

पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेश मुख्यमंत्रीपदी एन. रंगास्वामी यांची राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी निवड केली. रंगास्वामी यांचा बुधवारी, 13 मे रोजी शपथविधी होईल.

**नवीकरणीय**

नवीकरणीय ऊर्जा क्षमतेच्या बाबतीत भारतानं स्थापित केलेल्या मापदंडानं आता जागतिक स्तरावर तिसरा क्रमांक गाठला आहे. मॉर्गन स्टँनली या वैश्विक वित्तीय सेवा देणाऱ्या संस्थेनं दिलेल्या नवीन अहवालानुसार, भारताच्या नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील स्थित्यंतर हे उर्जा क्षमतेच्या बाबतीत बाह्य अवलंबित्व कमी करण्यास मदत करेल. परंतु या प्रक्रियेचे यश हे, सौर सेल, त्यासाठी लागणारे सोलर वेफर्स आणि पॉलिसिलिकॉन यांसारख्या महत्त्वपूर्ण घटकांचं उत्पादन देशांतर्गत पातळीवर किती वेगानं सुरू केलं जातं, यावर अवलंबून असेल असंही या संस्थेनं स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, देशांतर्गत सौर मॉड्यूलची क्षमता आता दुप्पट झाली आहे. मार्च 2024 ते 2025 या कालावधीत ही क्षमता 38 गिगावॅट्सवरून 74 गिगावॅट्सपर्यंत पोहोचली आहे. सौर पेशींची क्षमताही 9 गिगावॅट्सवरून 25 गिगावॅट्सपर्यंत वाढली आहे. सौर ऊर्जा निर्मितीतील काही प्रमुख प्रारंभिक टप्प्यातील घटकांसाठी भारत अजूनही आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे.

**इराण-अमेरिका**

इराणच्या समृद्ध युरेनियमपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही इराणी नागरिकाला अमेरिकेच्या हल्ल्याचा सामना करावा लागेल असा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. हे आण्विक साहित्य अमेरिकन लष्कराच्या सतत देखरेखीखाली आहे. असं ट्रंप यांनी एका दूरचित्रवाणी मुलाखतीत काल स्पष्ट केलं. इराणनं हे युरेनियम देशाबाहेर हस्तांतरित करावं आणि

आपला अणुकार्यक्रम पूर्णपणे बंद करावा, असा इशारा अमेरिकेनं दिला आहे. तेहराननं देशांतर्गत उर्जा संवर्धन कार्यक्रम हा आपला हक्क असल्याचं म्हटलं आहे. दरम्यान, या मुलाखतीपुर्वी इराणनं पश्चिम आशियातील युद्ध संपवण्याच्या उद्देशाने केलेल्या अमेरिकेच्या ताज्या प्रस्तावाला इराणने औपचारिकपणे आपला प्रतिसाद सादर केला आहे.

**हंता वायरस**

हंता व्हायरसनं बाधित झालेल्या नेदरलँडसच्या जहाजावरील दोन भारतीय नागरिक सुरक्षित असून त्यांच्यात कोणतीही लक्षणे नसल्याचं स्पेनमधील माद्रिद इथल्या येथील भारतीय दूतावासानं म्हटलं आहे. भारतीय राजदूत आणि स्पेनचे अधिकारी या दोन बाधित नागरिकांच्या संपर्कात आहेत. या जहाजावर एकंदर दीडशे प्रवासी होते. या रोगाच्या प्रादुर्भावानंतर हे जहाज काल स्पेन मधील कानरी बेटाजवळ नांगर टाकून थांबवण्यात आलं. बाधित रुग्णांना लष्करी रुग्णालयात विलगीकरणात ठेवण्यात येणार आहे.

**आयपीएल क्रिकेट**

आयपीएल क्रिकेटमध्ये, काल रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं मुंबई इंडियन्सचा दोन गडी राखून पराभव केला. तत्पूर्वी झालेल्या आणखी एका सामन्यात चेन्नई सुपर किंग्जनं लखनौ सुपर जायंट्सचा 5 गडी राखून पराभव केला. पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात आज संध्याकाळी धरमशाला इथं सामना होणार आहे.

**नेमबाजी**

कझाकस्तानमधील आयएसएसएफ विश्वचषक शॉटगन स्पर्धेत नेमबाजीमध्ये, भारतीय जोडी नीरू धांडा आणि विवान कपूर यांनी ट्रॅप मिश्र सांघिक प्रकारात कास्यपदक मिळवलं आहे.

**बॉक्सिंग**

ताश्कंद इथं होत असलेल्या सतरा वर्षांखालील आणि पंधरा वर्षांखालील आशियाई मुष्टीयुद्ध स्पर्धेत, यश कुमार, संस्था अशोक कुमार, समीर बोहरा, सुदर्शन चांडक, मोहम्मद यासर आणि रौनक लोखंडे हे भारताचे सहा मुष्टीयोद्धे विविध वजनी गटात अंतिम फेरीत दाखल झाले आहेत तर अन्य सात खेळाडूंना कास्य पदक मिळालं आहे.

**उत्तराखंड**

उत्तराखंडमध्ये सध्या असलेल्या प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीत चार धाम यात्रेकरूंना आणि पर्यटकांना सावध राहण्याचं आवाहन उत्तराखंड प्रशासनानं केलं आहे. भारतीय हवामान विभागाने उत्तराखंडच्या विविध भागांत विशेषतः पर्वतीय क्षेत्रांत उद्या आणि परवा जोरदार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. अचानक बदलणाऱ्या हवामानाची दखल घेत, गढवालचे विभागीय आयुक्त विनय शंकर पांडे यांनी भाविकांना आणि पर्यटकांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे. आपल्या प्रवासादरम्यान हवामानाविषयीची अद्ययावत माहिती घ्यावी आणि अत्यंत सावधगिरीनं आपल्या प्रवासाचं नियोजन करावं, प्रवासादरम्यान जिल्हा प्रशासन आणि स्थानिक अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचं यात्रेकरूंनी पालन करावं, असं आवाहनही त्यांनी केलं.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं पुढील 3 ते 4 दिवस गुजरात आणि राजस्थानच्या काही भागांत उष्णतेच्या लाटेचा अंदाज वर्तवला आहे तर आसाम, मेघालय, केरळ, माहे, तामिळनाडू, पुदुच्चेरी आणि कराईकलमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.